दुरध्वनी- ०२० -२६३६०९४१

सत्यमेव जयते
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्वीन्स गार्डन, पुणे-४११००१

E-mail:trti.mah@nic.in
Website: trti.maharashtra.gov.in

जा क्र. आसंप्रसं/२०२३-२४/स्पर्धा परीक्षा/का- ४/ ३५४५

दिनांक : ०१.११.२०२३ 02

प्रति,

**सहआयुक्त,**
**अनुसूचित जमात प्रमाणपत्र तपासणी समिती, (सर्व १५ समिती)**

**विषय :** **वर्ष २०२३-२४ संघ लोकसेवा आयोग (UPSC)च्या नागरी सेवा स्पर्धा परीक्षा संपूर्ण तयारीकरिता दिल्ली येथील खाजगी नामांकित संस्थेमधून प्रशिक्षण देणे योजनेमध्ये प्रवेश घेण्यासाठी उमेदवारांची शैक्षणिक व इतर मूळ कागदपत्रे तपासणी करून त्याचा अहवाल पाठविणेबाबत...**

**संदर्भ :** आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय क्र. प्रशिक्षण २०२१/ प्र.क्र. ३४/का -९, दिनांक २० एप्रिल, २०२१.

संदर्भ क्र. १ अन्वये, वर्ष २०२३-२४ या कालावधीमध्ये **संघ लोकसेवा आयोग (UPSC) च्या नागरी सेवा स्पर्धा परीक्षा संपूर्ण तयारीकरिता दिल्ली येथील खाजगी नामांकित संस्थेमधून प्रशिक्षण देणे** योजना राबविण्यात येत आहे. यासाठी दिनांक २१ ऑक्टोबर, २०२३ रोजी महाराष्ट्रातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची सामाईक प्रवेश परीक्षा घेण्यात आली तसेच त्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांपैकी निवड केलेल्या १०० गुणवत्ता यादी (Merit List) तील उमेदवार आणि ५० प्रतीक्षा यादी (Waiting List) तील उमेदवारांची यादी दिनांक ०१.११.२०२३ रोजी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या वेबसाईट वर प्रसिध्द करण्यात आली आहे.

या यादीनुसार आपल्या कार्यक्षेत्रातील उमेदवारांचे शैक्षणिक व इतर कागदपत्रे तपासायची आहेत. यासाठी **दिनांक ०१ ते ११ नोव्हेंबर, २०२३** हा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. या कालावधीत **दिनांक ०४.११.२०२३ आणि दिनांक ११.११.२०२३ रोजी शनिवार** असल्याने उमेदवार कागदपत्रे तपासणी करण्यासाठी येऊ शकतात. तरी **०१ ते ११ नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत** आपल्या कार्यालयातील तपासणी अधिकाऱ्यांना कार्यालयात उपस्थित राहण्यास सूचित करून गुणवत्ता यादी व प्रतीक्षा यादीतील उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची तपासणी करावी. उमेदवारांचे कागदपत्रे तपासणी करतांना ज्या कागदपत्रांची तपासणी करावयाची आहे - त्या बाबतचा **तपासणी तक्ता, हमीपत्र, प्रवेश अर्ज (Admission Form) तसेच गुणवत्ता यादी आणि प्रतीक्षा यादी** आपल्या सुलभ संदर्भासाठी पत्रासोबत जोडण्यात येत आहे.

सोबत जोडण्यात आलेल्या गुणवत्ता/ निवड यादी व प्रतीक्षा यादीतील उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची तपासणी करून **त्या कागदपत्रांची एक छायांकित प्रत, संबंधित इतर कागदपत्रे** व **तपासणी केलेल्या उमेदवारांचा अहवाल** संकलित करून **आपल्या कार्यालयाच्या प्रतिनिधी सोबत** कागदपत्रांचा संच, हमीपत्र व प्रवेश अर्ज या कार्यालयास सादर करावे. **निवड यादीतील व प्रतीक्षा यादीतील उमेदवारांना आपल्याकडील तपासणी अहवाल प्राप्तीनंतरच दिल्ली येथील UPSC प्रशिक्षण कार्यक्रमात प्रवेश देण्यात येणार आहे.**

**दिनांक ०१ ते ११ नोव्हेंबर, २०२३ या विहित कालावधीनंतर (मूदत समाप्तीनंतर) गुणवत्ता यादीतील व प्रतीक्षा यादीतील उमेदवारांची कागदपत्रे तपासणी करण्यात येऊ नयेत.**

कागदपत्रे तपासणी दरम्यान कोणतीही अडचणी उद्‌भवल्यास श्रीमती पुष्पलता मडावी संग्रहालय अभिरक्षी तथा अधिव्याख्याता, स्पर्धा परीक्षा कक्ष (भ्रमणध्वनी ८६९८४३८८३८) यांच्याशी संपर्क साधावा.

(चंचल पाटील)
सहसंचालक
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे